## सुविचार

सत्याच्या मार्गांवर चालणारे नेहमी विजय मिळवतात.

## संपादकीय

# दुर्दैवी आणि भयंकर

प्रवासी म्हणून आततायी कृती करायची नाही, थोडी वाट पाहायची आणि रेल्वेमार्गावर तर अजिबात उड्या मारायच्या नाहीत, हे प्राथमिक आकलन आपल्या नागरिकांना असायला हरकत नाही; पण पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याची अफवा उठली आणि त्यातून हा सारा प्रकार घडला. भारतात खरे तर गेल्या काही वर्षांमध्ये रेल्वे अपघातांचे प्रमाण कमी होत चालले आहे. या अपघातांची तीव्रता आणि बळींची संख्याही कमी होते आहे. काही वर्षांपूर्वी दरवर्षी रेल्वेचे सरासरी १७१ मोठे अपघात होत असत; ते प्रमाण आता ४०वर आले आहे. अर्थात, हेही प्रमाण जास्तच आहे आणि एक रेल्वे अपघातही फार मोठी हानी करून जातो. जळगाव जिल्ह्यात बुधवारी झालेला रेल्वे अपघात तर निव्वळ दुर्दैवी आहे. प्रवासी म्हणून आततायी कृती करायची नाही, थोडी वाट पाहायची आणि रेल्वेमार्गावर तर अजिबात उड्या मारायच्या नाहीत, हे प्राथमिक आकलन आपल्या नागरिकांना असायला हरकत नाही; पण पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याची अफवा उठली आणि त्यातून हा सारा प्रकार घडला. रेल्वे डब्यांना अशी आग लागत नाही आणि डब्यांच्या खाली ठिणग्या उडण्याची घटना ही धोकादायक नसते, हे प्रवाशांना माहीत असायला हवे किंवा रेल्वे खात्यानेही प्रवाशांचे हे शिक्षण करायला हवे. दूर पल्ल्याच्या गाड्यांमध्ये आजही सर्व प्रवाशांशी एकाच वेळी दूरसंवाद साधण्याची कोणतीही कार्यक्षम सुविधा नाही. पुष्पक एक्स्प्रेसच्या चालकाने किंवा गार्डने सर्व प्रवाशांशी असा संवाद साधला असता आणि कोणतीही आणीबाणीची परिस्थिती उद्भवलेली नाही, अशी खात्री दिली असती, तर हा अपघात नक्कीच टळला असता. समोर मार्गावर अचानक अनेक प्रवासी दिसल्यानंतर, दुसऱ्या गाडीच्या चालकाच्या हातातही काहीच पर्याय नसतो. उलट तो काही आततायी निर्णय घेईल, तर त्या गाडीतील शेकडो प्रवासी संकटात सापडू शकतात; त्यामुळे विरुद्ध दिशेने येणाऱ्या कर्नाटक एक्स्प्रेसखाली अनेक प्रवासी आले. ते वाचू शकले नाहीत. तीन दशकांपूर्वी मुंबईत असाच भयंकर अपघात झाला होता. केवळ घाबरून महिलांच्या डब्यातील प्रवाशांनी रेल्वेमार्गावर उड्या घेतल्याने तेव्हा ४९ महिला प्रवाशांचा प्राण गेला होता. अशा दुर्घटनांमधून आपण समाज म्हणून कोणताही धडा शिकत नाही, हेच दुर्दैवी आहे. ज्या पुष्पक एक्स्प्रेसमधील प्रवाशांचा बळी गेला, त्या गाडीची साखळी कुणी तरी खेचली. त्या वेळी झालेल्या घर्षणातून ठिणग्या उडाल्या आणि मार्गावर पडलेले कापड पेटले, असे म्हटले जाते. खरे काय ते चौकशीत समोर येईलच. मात्र, रेल्वे मार्गावर कोणत्याही वस्तू, कापड, अडथळे असू नयेत, ही रेल्वे खात्याची अपेक्षा चूक नाही. ठिणग्या दिसल्या म्हणजे मोठी आग लागू शकते, असा भयगंड निर्माण होतो; याचे कारण अशा मोठ्या आगी लागून रेल्वे दुर्घटना घडल्या आहेत. गुजरातमध्ये गोध्रा येथे रेल्वे डब्याला लागलेल्या किंवा लावलेल्या आगीत कित्येक प्रवाशांचा जळून कोळसा झाला होता. अशा प्रकारच्या दुर्घटना समाजाच्या सुप्त मनात कुठे तरी जाऊन बसतात आणि छोटेसे संकट दिसले, तरी प्रवासी जिवावर उदार होऊन जीव वाचविण्याचा प्रयत्न करू लागतात. जीव वाचविण्याचा प्रयत्नच असा जिवावर बेतत असेल, तर ऐन वेळी केलेल्या धावपळीला अर्थ तरी काय उरतो? मध्यंतरी रेल्वेने कोणत्याही गाडीच्या क्षमतेपेक्षा किती टक्के जास्त प्रवासी न्यावेत, यावर गंभीर चर्चा झाली होती. ती पुढे गेली नाही. समजा, दीड हजार एकूण क्षमता असणाऱ्या गाडीतून चार किंवा पाच हजार प्रवासी प्रवास करीत असतील, तर कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगाची तीव्रता कित्येक पटींनी वाढते. मागे मुंबईत केवळ खचाखच भरलेल्या जिन्यावर काही तरी अफवा उठल्याने झालेल्या धक्काबुक्कीत अनेकांचा बळी गेला होता. इथेही पुष्पक एक्स्प्रेसमध्ये कुणी तरी एक प्रवासी 'तिकडे आग लागलीये...' असे ओरडल्याने गोंधळाला सुरुवात झाल्याचे आता उघड होत आहे. अशा वेळी शांत राहणे आवश्यक असते. नीट चौकशी करावी लागते. एखादा शहाणा, संयमी प्रवासी असेल, तर तो रुळांवर उड्या टाकणाऱ्यांना रोखू शकतो. असे काही अपघात टळले आहेत. मात्र, अशी अफवा उठली, की कुणाला क्षणाचीही उसंत नसते. अनेकांना शौर्य दाखविण्याची सुरसुरी येते. हे सगळे टाळण्यासाठी लोकशिक्षण हाच मार्ग असतो. संकटप्रसंगी कसे वागायचे, याचे रीतसर शिक्षण घ्यावे लागते. प्रसंगावधान अचानक उगवत नाही, तेही शिकावे लागते. एकीकडे आपण बुलेट ट्रेनच्या गप्पा मारतो, देशभरात हजारो किलोमीटर मेट्रो लाइन सुरू करण्याचे नियोजन करतो; पण आपले रेल्वे प्रवासी असे मृत्यूच्या दाढेत ढकलले जातात. या दोन्हीतला विरोधाभास कधी तरी मिटणार आहे की नाही? तो मिटायचा असेल, तर समाज आणि सगळ्या यंत्रणांना शहाणपणाची आणखी बरीच वाट चालावी लागेल.

'कर्मयोगी' हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक नंदकुमार ज्ञानेश्वर लोखंडे** यांनी हर्षद प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिशर्स, बनवडी पो.पार्ले, ता.कराड, जि.सातारा येथे छापून दैनिक कर्मयोगी कार्यालय ११६,श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, बुधवार पेठ, कराड ४१५११० जि.सातारा (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. **संपादिका सौ.मंगल नंदकुमार लोखंडे** *कार्यकारी संपादक - खंडू इंगळे *पीआरबी अ‍ॅक्ट १८६७ नुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील. **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Karmayogi,** Printer, Publisher and Owner **Nandkumar Dnyaneshwar Lokhande** Printed at Harshad Printers And Publishers, Banawadi Post-Parle Tal-Karad Dist-Satara (MS) And Published at Daily Karmayogi Karyalay. 116, Shrdha Complex, Station Road, Budhawar Peth, Karad 415 110 Dist-Satara (MS) Editor **Mrs.Mangal Nandkumar Lokhande** *Exceutive Editor **Khandu Ingale** *PRB Act 1867 Editorial Responsibility **RNI NO-MAHMAR/2001/3806**

**Email - karmyogi2008@gmail.com**

**मुख्य कार्यालय:** ११६,श्रध्दा कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, बुधवार पेठ, कराड. ४१५११० (मोबा.९३२६१३३७३१) सातारा प्रतिनिधी :८४२१८२२५०० सोलापूर कार्यालय:(मोबा.९३७१८०७१४५) कोल्हापूर शहर कार्यालय-संपर्क (मोबा.९२२५८१२४२४). पंढरपूर शहर कार्यालय-संपर्क (मोबा.९०२८३४६४१५).

# रहिमतपूर नगरपरिषद,रहिमतपूर जि.सातारा

## अधिसूचना

### कलम -३ अन्वये नगरपालिका (क) वर्ग ने जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील

१. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५
२. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दिनांक १३/०६/२०१५
३. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दिनांक ०४/०९/२०१७
४. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दिनांक २६/०८/२०१९
५. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/नवि-२० दिनांक २९/०१/२०२१
६. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२० दिनांक २९/०१/२०२१
७. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक ३०/०९/२०२२
८. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक १५/१२/२०२२
९. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२/प्र.क्र.३२/नवि-३२ दिनांक ०९/०१/२०२४
१०. मा. सह सो., नगर परिषद आयद प्रशासकीयालय, मुंबई परिस्थिती परिषद क्र. नपप्रसं/का-०८/ई-गव्हर्नंस/DUTD/RTS/२०२५/१६२ दिनांक ०६/०१/२०२५

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | आवश्यक कागदपत्र | फी | अधिसूचित सेवेची नियत कालमर्यादा | पद निर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी(संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी(संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ वास्तव्याचा पुरावा<br>३ वयाचा पुरावा<br>४ विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५ ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | विवाह नोंदणी अधिनियम १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ दस्तऐवजाची प्रत (खरेदीखत/ बक्षीसपत्र/ वाटणीपत्र व इतर) | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ वारस हक्क प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३ मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे उतारा | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३ मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ वास्तूविशारदाख दाखला<br>३ मालकी हक्काची कागदपत्रे<br>४ बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५ मोजणी नकाशा<br>६ मंजूर रेखांकनाची प्रत | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटदार प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३ जोते प्रमाणपत्र<br>४ घर मालक/ वास्तूविशारद यांचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | नळ जोडणी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ जागा मालकी कागदपत्रे<br>३ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १३ | जल निस्सारण जोडणी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ जागा मालकी कागदपत्रे<br>३ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १४ | अग्निशमन नाहरकत दाखल देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ वास्तु शिल्पकार यांचा अर्ज<br>४ अग्निप्रतिबंधक उपाययोजनाबाबतची रूपरेषा<br>५ कॅपिटेशन फि | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १५ | अग्निशमन अंतिम नाहरकत दाखला देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ वास्तु शिल्पकार यांचा अर्ज<br>४ अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र<br>५ License Agency यांचे नमुना अ प्रमाणपत्र<br>६ अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १६ | नव्याने कर आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ भोगवटा प्रमाणपत्र | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १७ | पुन:कर आकारणी | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १८ | कराची मागणीपत्र तयार करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| १९ | करमाफी मिळणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| २० | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सुट मिळणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |

Scanned with Oken Scanner

| अ.क्र. | अधिसूचित सेवेचे नाव | आवश्यक कागदपत्र | फी | अधिसूचित सेवेची नियत कालमर्यादा | पद निर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५३ | मोबाईल टॉवर परवाना | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना<br>३ संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा<br>४ वैद्य भाडेकरारनामा<br>५ स्थळाचा नकाशा (१:१०००)<br>६ ज्या इमारतींवर टॉवर उभारायचा आहे त्याचे वैद्य भोगवटा प्रमाणपत्र<br>७ संबंधित इमारतीच्या/जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र<br>८ सक्षम प्राधिकाऱ्याचा अग्निशमन ना-हरकत दाखला<br>९ सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र<br>१० पर्यावरण विभागाची ना-हरकत<br>११ संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र<br>१२ शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने/ दस्तऐवज | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | बांधकाम अभियंता | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५४ | रस्ता खुदाई परवानगी देणे, नवीन परवाना व नुतनीकरण | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | नगरअभियंता (स्थापत्य) | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५५ | राज्याच्या खाद्य परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ ज्या इमारतीत सदर आस्थापना/ कारखाना होणार आहे.त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५६ | खाद्य नोंदणी प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्य विषयक ना-हरकत प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ ज्या इमारतीत सदर आस्थापना/ कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे<br>४ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५७ | पाणी उपसा करणेसाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ थकबाकी नसल्याचा दाखला<br>३ ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे पर्जन्य जल पुनर्भरण करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र<br>४ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | पाणीपुरवठा अभियंता | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ५८ | लॉजिंग हाऊस परवाना देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५९ | लॉजिंग हाऊस परवान्याचे नुतनीकरण करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६० | मंगल कार्यालय/ सभागृह वैगेरे परवाना देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६१ | मंगल कार्यालय/ सभागृह वैगेरे परवान्याचे नुतनीकरण करणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६२ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६३ | भूमिगत दूरसंचार वाहिनी (ऑप्टीकल फायबर केबल) टाकण्याकरीता परवानगी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/सी.आर.२४२/ UD-20 दिनांक १९/१२/२०२२ मधील Sehedule III नुसार आवश्यक कागदपत्रे<br>३ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय दुरसंचार समिती | प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग व अध्यक्ष राज्यस्तरीय दुरसंचार समिती |
| ६४ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्षतोड परवानगी देणे | १ विहित नमुन्यातील अर्ज<br>२ शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ४५ दिवस | नियोजन प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी | नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी | नियोजन प्राधिकरणाकडील वृक्ष प्राधिकरण |
| ६५ | रस्त्यावरील खड्डे बुजविणे | १ पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६६ | गटारावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे | १ पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |
| ६७ | शहरात स्वच्छता ठेवणे | १ पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | नगरपरिषद स्तरावर निश्चित केलेले दर | १ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालयीन अधिक्षक | मुख्याधिकारी |

शिक्का

सही/-
(कौस्तुभ गव्हाणे)
मुख्याधिकारी
रहिमतपूर नगरपरिषद, रहिमतपूर

पान नं.१ वरून...

## वक्फ बोर्ड जेपीसी बैठकीत...

निशिकांत दुबे म्हणाले की, विरोधी पक्षातील लोक, विशेषत: ओवैसी, असे मानतात की आम्ही जम्मू-काश्मीरच्या संपूर्ण प्रतिनिधित्वाचे ऐकले नाही. आज विरोधकांचे विचार आणि दृष्टिकोन उघड झाले आहेत. त्यांनी मिरवाईजसमोर गोंधळ घातला आणि गैरवर्तन केले. हे संसदीय लोकशाहीच्या विरोधात आहे. ते म्हणाले की, विभागवार चर्चेसाठी आज आणि उद्या बैठक झाली असली तरी, दुसरी बैठक २७ जानेवारी किंवा २८ जानेवारी रोजी होईल. ही बैठक आधीच २७ जानेवारीला होणार होती. बहुतेक सदस्यांनी २७ जानेवारी रोजी बैठक घेण्याचे सुचवले आहे. आम्ही २९ जानेवारी रोजी अध्यक्षांना अहवाल सादर करू.

**पुढील बैठक २७ जानेवारी रोजी**

जेपीसीची पुढील बैठक २७ जानेवारी रोजी होणार आहे. या बैठकीत एकामागून एक विभागांवर चर्चा होईल. यानंतर अंतिम अहवाल तयार केला जाईल. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात समिती आपला ५०० पानांचा अहवाल सादर करेल असे समजते. आतापर्यंत, समितीने दिल्लीत ३४ बैठका घेतल्या आहेत आणि अनेक राज्यांना भेटी दिल्या आहेत जिथे २४ हून अधिक भागधारकांना बोलावण्यात आले होते. देशभरातील २० हून अधिक वक्फ बोर्ड समितीसमोर हजर झाले.

## हत्येसाठी वापरलेल्या शस्त्रांची...

मात्र, अद्याप सीआयडीला तलवारीसारखी धारदार शस्त्रे, चार लोखंडी रॉड, कोयता, फायटर ही हत्यारे अद्याप सापडलेली नाहीत. त्यामुळे ती आरोपींनी नेमकी कुठे टाकली याबाबतचा तपास सुरु आहे.

## अट्टल घरफोडी चोरट्यास...

यामध्ये गुन्हे प्रकटीकरण शाखेला रात्री दुकाने फोडून चोरी करणाऱ्या चोरट्याची माहिती मिळाली. संशयावरुन सातारा तालुक्यातील संतोष रामचंद्र गावडे (रा. बेंडवाडी, पो.आसनगाव) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी विचारपूस केल्यावर त्याने हॉटेलमध्ये चोरी केल्याचे कबूल केले. तसेच इतर माहितीही दिली.

या कारवाईत गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शामराव काळे, उपनिरीक्षक सुधीर मोरे, हवालदार नीलेश यादव, सुनील मोहिते, सुजीत भोसले, नीलेश जाधव, विक्रम माने, पंकज मोहिते, सचिन रिटे, इरफान मुलाणी, संतोष घाडगे, सागर गायकवाड, विशाल धुमाळ, मच्छिंद्रनाथ माने, सुशांत कदम, तुषार भोसले, सुहास कदम आदींनी सहभाग घेतला.

# पहिले 'एआय' विद्यापीठ महाराष्ट्रात:ना.आशिष शेलार

**मुंबई,दि.२४(वृत्तसंस्था)**

जगभरात कृत्रिम बुद्धिमत्तेला चालना देण्यावर भर दिला जात असून, आता महाराष्ट्र सरकारनेही या संदर्भात महत्त्वाची घोषणा केली. महाराष्ट्र भारतातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करणार असल्याचे राज्याचे माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी शुक्रवारी (२३ जाने.) जाहीर केले.

जागतिक शिक्षण दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना मंत्री आशिष शेलार यांनी म्हटले की, कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय हा राज्य सरकारचा ऐतिहासिक प्रकल्प ठरणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखालील मंत्रालयाच्या सहकार्याने हा प्रकल्प राबवला जाणार आहे. तंत्रज्ञान विभाग आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीने प्रेरित उद्योग आणि तंत्रज्ञान क्रांतीसाठी विद्यार्थ्यांना आणि तरुणांना आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करणारे हे विद्यापीठ असेल, असे शेलार यांनी सांगितले.

हे विद्यापीठ अत्याधुनिक संशोधन आणि कौशल्य विकासासाठी केंद्रस्थानी राहील. इतकेच नाही तर हे विद्यापीठ भारतीय तरुणांना कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित जागतिक अर्थव्यवस्थेत आणि बदलांचे नेतृत्व करण्यासाठी तयार करेल, असे मंत्री आशिष शेलार म्हणाले. सरकार लवकरच देशातील पहिले राज्यस्तरीय कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर धोरण जाहीर करणार असून, यासाठी एक विशेष टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे, अशी माहिती शेलार यांनी यावेळी दिली.

# रामायण कथा सोहळ्यास सुर्लीमध्ये उदंड प्रतिसाद




रामायण कथा सादर करताना ह.भ.प.सोनाली करपे यावेळी रामकृष्ण वेताळ व प्रदीप वेताळ उपस्थित होते.

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.२४**

श्रीराम मंदिर स्थापना दिवसानिमित्त कराड तालुक्यातील सुर्ली या ठिकाणी रामायण कथा सोहळ्याचे आयोजन केले होते. या ठिकाणी ह.भ.प. सोनाली करपे,श्री.क्षेत्र सद्गुरू कल्याण स्वामी संस्था चकलंबा यांनी रामायण कथा सादर केली. अतिशय भक्तिमय वातावरणात त्यांनी रामायण कथा सादर करून सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या रामायण कथेसाठी श्रीराम वारकरी संस्था आरेवाडी येथील २५० बाल वारकऱ्यांनी सहभाग घेतला होता. याचबरोबर अतिशय सुंदर मृदंग वादन ही सादर केले. ह.भ.प.गणेश महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली बाल वारकऱ्यांनी मृदंग वादन सादर केले.हे मृदंग वादन ऐकून श्रीराम भक्त तल्लीन झाले होते.

आयोध्या येथील राम मंदिराच्या स्थापना दिवसानिमित्त रामकृष्ण वेताळ युवा मंच कराड उत्तर यांच्यावतीने या संगीतमय राम कथा सोहळ्याचे आयोजन केले होते.या सोहळ्यास कराड तालुक्यासह कोरेगाव, खटाव, सातारा या तालुक्यातून राम भक्तांनी हजेरी लावली होती.सकाळी आठ ते सायंकाळी दहा वाजेपर्यंत विविध कार्यक्रम या ठिकाणी सादर करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांना अबाल वृद्ध आणि महिलांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. रामायण कथेचे हे सलग दुसरे वर्ष आहे. दरवर्षी या कथेला मोठा प्रतिसाद लाभत आहे.या रामायण कथेमुळे संपूर्ण वातावरण चैतन्यमय बनले होते.

Scanned with Oken Scanner